वाचलेः- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/०२/कावि/४४७/१५,दि.२०/१०/२०१५
३) प्रशा/९/कावि/२७२/२०१९ दि. २७/०५/२०१९
४) मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय खराळवाडी यांच्याकडील पत्रक्र.५०/२०२०दि२५/०२/२०२०
५) मा.लेखाधिकारी यांचेकडील पत्र क्र.१४८४/२००७दि.०४/०२/२०२० चे घरबांधणी अग्रीम ना हरकत प्रमाणपत्र,
६) प्रशा/०९/कावि/१५०/२०२०दि.१७/०३/२०२०
७) दि.१९/०३/२०२० चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/२२५/२०२०
दि.१९/०३/२०२०

विषय – <u>नियत वयोमानानुसार सेवानिवृतीबाबत.</u>
श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर (मुख्याध्यापिका)
सं.क्र.५७४०

आदेश,

श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर (मुख्याध्यापिका) हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहा.शिक्षक या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि.०६/०७/१९८७ रोजी रूजू झालेल्या आहेत. श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर (मुख्याध्यापिका) यांची जन्म दिनांक ०१/०६/१९६२ अशी असून त्यांच्या वयास दिनांक - ३१/०५/२०२० रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर (मुख्याध्यापिका) यांना ३१/०५/२०२० रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे क्रमप्राप्त आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील, त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमाननुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे तरतुद आहे.

श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर (मुख्याध्यापिका) यांचे विरूध्द सद्यस्थितीत कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर (मुख्याध्यापिका) संगणक क्र.५७४० यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज,घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम, कामगार कल्याण कर्ज येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत, तथापी माध्यमिक शिक्षण सहकारी पतपेढी यांच्याकडील दि.३०/०१/२०२० च्या दाखल्यावरून श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर मुख्याध्यापिका यांच्याकडे रक्कम रूपये- ३,५०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये तीन लाख पंन्नास हजार रूपये फक्त ) येणे बाकी असल्याचे दिसुन येत आहे. त्यानुसार श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर यांच्या देय रक्कमेतुन रक्कम रूपये- ३,५०,०००/- कपात करून माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादीत मोरवाडी पिंपरी,पुणे-१८ यांना अदा करणेत यावे,भविष्यात माध्यमिक विभागातील इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर (मुख्याध्यापिका) संगणक क्र.५७४० यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील, श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर (मुख्याध्यापिका) यांना सेवासात्यत देण्यात आलेले नाही.



Scanned by CamScanner

तथापी श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर मुख्याध्यापिका यांना ए.सी.बी.कारवाई अंतर्गत सेवानिलंबित करणेत आलेले होते.उपरोक्त वाचले क्र.०३ अन्वये त्यांचे सेवानिलंबन रद्द करून त्यांना पुन्हा कामावर घेणेत आलेले आहे. श्रीम.अलका ज्ञानेश्वर कांबळे यांचे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयामार्फत दाखल असलेला खटला क्र.१५८/१७ दि.२१/०३/२०१७ त्या अनुषंगाने मा.न्यायालयात होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

सबब,मी शिक्षणाधिकारी,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार तसेच वाचले क्र.०६ च्या अभिप्रायास तसेच मनपा तर्फे खातेनिहाय चौकशीत त्यांचेवर अंशत: दोषारोप सिध्द झाले असुन त्यास,व ए. सी. बी. कारवाई अंतर्गत दाखल असलेला खटला क्र.१५८/१७ दि.२१/०३/२०१७ चे अंतिम निर्णयाचे व उपरोक्त बाबींना अधिन राहून दि.३१/०५/२०२० रोजी मध्यान्होनंतर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम. कांबळे अलका ज्ञानेश्वर (मुख्याध्यापिका) संगणक क्र.५७४० यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्रीम.कांबळे अलका ज्ञानेश्वर (मुख्याध्यापिका)
सं.क्र.५७४०
माध्यमिक विद्यालय खराळवाडी
प्रत:- १) लेखा शाखा
२)प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय खराळवाडी
२/- पुढील कार्यवाहीसाठी



Scanned by CamScanner